**संदर्भ :** १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम, २४४ व २४५.
२. महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२.
३. आदेश - जा.क्र./जावप/कक्ष-१/५२९/२०२१, दि.२५/१०/२०२१.
४. महाराष्ट्र महानगरपालिका, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:याचिका-३०१७ / प्र.क्र.१३० / नवि-२२, दि. १४ नोव्हेंबर, २०२२.
५. मा. पोलीस आयुक्त यांचेकडील अधिसूचना क्र. कक्ष-१०/विशा/पो.बॅ.हो.फ./अधिसूचना/२८००/२०२१, दि.१७/०९/२०२१.
६. सह आयुक्त, नगरपरिषद संचालनालय, नवी मुंबई यांचेकडील पत्र-जा.क्र.नप्रसं/का-०६ / २०२४ / जहिया-१५५/२०११/८६८५, दि.२०/१२/२०२४.
७. उप अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, पश्चिम यांचा दि.०३/०१/२०२५ रोजीचा अभिप्राय.
८. शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा नाशिक यांचेकडील दि.०९/०१/२०२५ रोजीचा अभिप्राय.

........................................................................................................................

नाशिक महानगरपालिका, नाशिक
जा.क्र./जापवि/कक्ष-१/ ९८५/२०२५
दिनांक : 20/ 05/२०२५.
NMC/DTD/OWL/२०२५/

**आदेश**

**विषय :** मनपा मालकीच्या खुल्या जागेंवर तात्पुरता स्वरुपात जाहिरात शुभेच्छा फलक प्रसिध्दीकरिता जागा निश्चिती करणेबाबत..

राज्यातील अनधिकृत जाहिराती / होर्डींग यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, जिल्हाधिकारी यांच्या क्षेत्रातील आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी व्यापक स्वरुपाचे आदेश मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१५५/२०११ या प्रकरणी दि.३१/०१/२०१७ रोजी दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१५५/२०११ व इतर याचिकांच्या अनुषंगाने सुनावणी सुरु असून, मा.न्यायालयाने सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपालिका व नगरपंचायती यांना त्यांच्या क्षेत्रामध्ये होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स लावण्यासाठी जागा निश्चित करण्याबाबत, जाहिराती / होर्डिंग्स इत्यादींबाबत दररोज दिल्या जाणाऱ्या परवानग्यांची माहिती संबंधित पोलिसांना उपलब्ध करून देण्याबाबत व प्रत्येक बॅनर / होर्डिंग इत्यादींवर अर्जदाराचे नाव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा **QR कोड** लावण्याबाबत सूचित केले आहे.

त्याअनुषंगाने, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नाशिक पश्चिम विभागात शुभेच्छा, वाढदिवस, सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, धार्मिक व भावपुर्ण श्रध्दांजली इ. कार्यक्रमासाठी आजमितीस मनपा मालकीच्या तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलकांसाठी **एकूण-१२** खुल्या जागा निश्चित करण्यात आलेल्या असून, संदर्भ क्र. २, ४ व ६ अन्वये आजपावेतो नाशिक शहराचा विस्तार / मागणी लक्षात घेता पुर्वीच्या निश्चित केलेल्या

**एकूण-१२** खुल्या जागा कायम ठेऊन, नव्याने सुचविण्यात आलेल्या **एकूण-३६** खुल्या जागेंना तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक प्रसिध्दीकरिता मंजुरी देणेत येत आहे.

| **अ.क्र.** | **निश्चित करण्यात आलेले जागेचे ठिकाण** | **संख्या** |
|---|---|---|
| १ | मॅरेथॉन चौक, गंगापुर रोड. | १ |
| २ | प्रमोद महाजन गार्डन, बोहरा पार्क समोर, गंगापुर रोड . | १ |
| ३ | प्रमोद महाजन गार्डन, गंगापुर रोड . | १ |
| ४ | चोपडा लॉन्स शेजारी, गोदावरी नदी पुलाजवळ. | १ |
| ५ | डॉ. वसंतराव पवार चौक, होरायझन स्कुल जवळ. | १ |
| ६ | आकाशवाणी भाजी मार्केट, गंगापुर रोड . | १ |
| ७ | जेहान सर्कल, गंगापुर रोड . | १ |
| ८ | भोसला मिलिटरी कॉलेज सर्कल, कॉलेज रोड . | १ |
| ९ | ऋषीकेश सोसायटी, भोसला मिलिटरी कॉलेज सर्कल, कॉलेज रोड . | १ |
| १० | राजमाता जिजाऊ चौक, डॉन बास्को स्कूल जवळ, कॉलेज रोड . | १ |
| ११ | दत्त चौक, गंगापुर रोड . | १ |
| १२ | मॉडेल कॉलनी चौक, कॉलेज रोड . | १ |
| १३ | शरणपुर पालिका बाजार, स्वागत कमानी जवळ, शरणपुर रोड . | १ |
| १४ | शरणपुर पालिका बाजार सिंग्नल जवळ, शरणपुर रोड . | १ |
| १५ | सिध्दार्थ नगर, समाजमंदिर जवळ, बारा बंगला, शरणपुर रोड . | १ |
| १६ | कृषीनगर जॉगिंग ट्रॅक, सायकल सर्कल जवळ, शरणपुर रोड . | १ |
| १७ | मा.उत्तमराव कांबळे सायकल सर्कल जवळ, शरणपुर रोड . | १ |
| १८ | एबीबी सर्कल, वाहतूक पोलीस चौकी जवळ, त्र्यंबकरोड, महात्मानगर. | १ |
| १९ | म्हसोबा मंदिर जवळ, सिटी सेंटर मॉल सिंग्नल, उंटवाडी. | १ |
| २० | सिटी सेंटर सिंग्नल, शहा प्रॉपटी जवळ, उंटवाडी. | १ |
| २१ | संभाजी चौक, बाफणा ज्वेलर्स समोर, उंटवाडी. | १ |
| २२ | बीएसएनएल ऑफिस जवळ, मायको सर्कल, त्र्यंबकरोड . | १ |
| २३ | जय भवानी हॉटेल जवळ, मायको सर्कल, त्र्यंबकरोड . | १ |
| २४ | गोल्फ क्लब मैदान भिंतीलगत, त्र्यंबकरोड, नाशिक. | १ |
| २५ | स्वा.विरसावरकर जलतरण तलाव जवळ, नाशिक. | १ |
| २६ | सिव्हील हॉस्पिटल भिंतीजवळ, त्र्यंबकरोड, नाशिक. | १ |
| २७ | संदिप हॉटले समोर, मनपा वाहनतळ खुल्या जागे जवळ, मुंबई नाका. | १ |
| २८ | वाहतूक पोलीस चौकी (वायरलेस नाका) मुंबई नाका. | १ |
| २९ | गंजमाळ सिंग्नल, कब्रस्तान भिंतीजवळ, नाशिक. | १ |
| ३० | संदर्भ सेवा रुग्णालय भिंतीलगत, मुख्य प्रवेशव्दार जवळ, शालीमार, नाशिक. | १ |
| ३१ | छ.शिवाजी महाराज उद्यान भिंतीलगत, सिबीएस, नाशिक. | १ |

| | | |
|---|---|---|
| ३२ | सिबीएस बस स्थानक जवळ, सिबीएस, नाशिक. | १ |
| ३३ | मनपा शॉपिंग सेंटर, अशोकस्तंभ, नाशिक. | १ |
| ३४ | यशवंत मंडई पाणपोई जवळ, रविवार कारंजा, नाशिक. | १ |
| ३५ | यशवंत व्यायाम शाळा, रेडक्रॉस सिंग्नल जवळ, महात्मा गांधी रोड, नाशिक. | १ |
| ३६ | नेहरु गार्डन, प्रवेशव्दार जवळ, शिवाजी रोड, नाशिक. | १ |
| **एकूण** | | **३६** |

उक्त नमूद मनपा मालकीच्या तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक प्रसिध्दीकरिता निश्चित करण्यात आलेल्या खुल्या जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७९, २४४ व २४५ व महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: याचिका-३०१७/प्र.क्र.१३०/नवि-२२, दि. १४ नोव्हेंबर, २०२२ अन्वये नाशिक पश्चिम विभागातील पुर्वीच्या निश्चित करण्यात आलेल्या **एकूण- १२** व नव्या निश्चित करण्यात आलेल्या **एकूण-३६** अशा **एकूण- ४८** खुल्या जागांना तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक प्रसिध्दीकरिता संदर्भ क्र.५ चे अधिसूचने अन्वये जाहिरात फलकास परवानगी देणे पुर्वी पोलीस विभागाकडून जाहिरातीचा मसुदा प्रमाणित करुन तात्पुरता स्वरुपातील निश्चित करण्यात आलेल्या जागेंवर **QR कोडसह** परवानगी देतांना खालील अटी-शर्ती लागु राहातील.

१. तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलकांना नियमोचित परवानगी देण्याची कार्यवाही विभागीय अधिकारी, नाशिक पश्चिम यांची राहील.
२. तात्पुरता स्वरुपातील जाहिरात परवानगीकरिता अर्ज, सर्वसाधारण विहित अशा संस्करण फी सह विहित नमुन्यात (नमुना-क) अन्वये महानगरपालिकेने विनिर्दिष्ट केलेल्या जागांवर तीन दिवसांपेक्षा अधिक नाही व ६ फूट लांबी X ३ फूट उंची किंवा ८ फूट लांबी X ३ फूट उंची किंवा ८ फूट लांबी X ६ फूट उंची पेक्षा अधिक आकाराचे नसलेल्या फलकांनाच परवानगी देण्यात यावी.
३. जाहिरात फलक प्रसिध्दी करणेपुर्वी पोलीस विभागाकडून जाहिरातीचा मसुदा प्रमाणित करून घ्यावा. त्याशिवाय परवानगी देण्यात येऊ नये.
४. सदर जाहिरात फलकासाठी प्रत्येकी उक्त नमूद आकारमानासाठी महानगरपालिकेने निश्चित केलेप्रमाणे प्रती जाहिरात फलक जागा लायसेंन्स फी, त्यावरील वस्तु व सेवाकर १८%, जाहिरात कर व प्रती जाहिरात फलक प्रतिभूती (सुरक्षा अनामत) इतकी सुरक्षा पोटी जमा करण्यात यावी, अर्जदार, कार्य अथवा प्रयोजन पुर्ण झाल्यानंतर लगेचच जाहिरात काढून टाकण्याची व्यवस्था करील, जे अवधी सामान्यत:३ दिवसांपेक्षा अधिक असता कामा नये. तशी माहिती मिळाल्यानंतर, प्रतिभूती (सुरक्षा अनामत) ठेवची रक्कम कोणत्याही शर्तीचा भंग केल्याबद्दल समपहरण केलेली नसेल, तर परत करण्यात यावी.
५. अर्जदाराने तात्पुरता स्वरुपातील प्रत्येक जाहिरात फलकांवर अर्जदाराचे नांव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा **QR कोड** मुद्रांकित करणे बंधनकारक असून, अर्जदारास निश्चित केलेल्या ठिकाणावरच जाहिरात फलक प्रसिध्दी करतील याची दक्षता घेण्यात यावी. **QR कोड** नसलेले निश्चित केलेले जागाव्यरिक्त होर्डींग, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इ. आढळून आल्यास सदर जाहिरात फलकांवर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५ मधील मुद्दा क्र. ३ व ५ अन्वये तात्काळ निष्काषित करण्याची कारवाई अनुसरण्यात यावी.

६. सदरचे जाहिरात फलकांवरील जाहिरातीमुळे सभ्यतेचा किंवा नीतिमत्तेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ आणि महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५ यातील सर्व तरतुदीसह सदरचे अटी-शर्ती लागू राहातील.

(करिश्मा नायर भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**प्रति : माहितीस्तव-**

**१. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर, नाशिक.**

२/- सदर आदेशाची अंमलबजावणी बाबतचे निर्देश आपले अधिनिष्ठ संबंधित अधिकारी/कर्मचारी, पोलीस स्टेशन व शहर वाहतुक शाखा, नाशिक शहर, नाशिक. यांना देणेस विनंती.

**२. सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतुक शाखा, नाशिक शहर, नाशिक.**

**प्रत : कार्यवाहीसाठी-**

१. उपआयुक्त (कर) जाहिरात व परवाने विभाग प्रमुख, मनपा नाशिक.
२. उपआयुक्त (अतिक्रमण) मनपा नाशिक.
३. विभागीय अधिकारी, नाशिक पश्चिम, मनपा नाशिक.
४. जाहिरात व परवाने विभाग, नाशिक पश्चिम, मनपा नाशिक.
५. आदेश फाईल.
६. स्थळप्रत.

**प्रत :**

**१. जनसंपर्क अधिकारी, मनपा नाशिक.**

२/- सदर आदेशातील नव्याने निश्चित केलेल्या जागा नागरिकांचे माहिती करिता प्रसिध्दी देणेत यावी.

**२. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा नाशिक.**

२/- सदर आदेशातील नव्याने निश्चित केलेल्या जागा मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येऊन नियमोचित परवानगी देणेकामी नाशिक पश्चिम विभागातील नागरी सुविधा केंद्रामधील संगणक कार्यप्रणालीमध्ये समाविष्ठ करण्यात याव्यात.